ISSN : 2278-9308

Monthly Peer Reviewed International Research Journal
Conference Special Issue January-2016


NATIONAL CONFERENCE ON

# Economics & Commerce

[illegible] & 28 January [illegible]

Sponsored by

B.C.U.D. Savitribai Phule, Pune University, Pune



Organized by

*Mahatma Gandhi Vidyamandir's*

**Department of Economics & Commerce**

**Arts & Commerce College,**

**Yeola Tal.Yeola.Dist.Nashik**

**Editor : Dr. R. D. Bhosale**

**Dr. R.Z.Pahilwan**

- PUBLISHED BY -

[illegible] Social Research & Development [illegible]

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | Prof.Dr. Thore Shivaji Dattatraya | Onion Marketing Management Strategy (India) in Nashik District | 94 |
| 16 | प्रा. श्रीमती. शेवाळे चंद्रकला एन. | राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था / निती आयोग | 109 |
| 17 | डी.के.मंडवधरे डॉ.एस.पी.देवरे | निती आयोग | 113 |
| 18 | उषा कारभारी अहिरे | सुक्ष्म वित्तामध्ये बँका आणि विमा क्षेत्राची भुमिका | 116 |
| 19 | वैशाली जिजाबा सोनवणे | भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यकालीन स्थिती | 118 |
| 20 | प्रा.डॉ.आर.डी.भोसले | भारतीय अर्थव्यवस्थेचेचालू आर्थिक परिस्थितीचे अध्ययन | 120 |
| 21 | प्रा.डॉ.एस.एम.पवार | आधुनिक अर्थव्यवस्थेमधील बँकांची भूमिका | 123 |
| 22 | स्वप्नाली रमेश खांडरे | जागतिक स्पर्धेत भारतीय अर्थव्यवस्थेचा बदलणारा चेहरा | 125 |

ISSN - 2278-9308

# जागतिक स्पर्धेत भारतीय अर्थव्यवस्थेचा बदलणारा चेहरा

स्वप्नाली रमेश खांडरे
संशोधक विद्यार्थी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**प्रस्तावना**

'मेक इन इंडीया' आणि 'डिजीटल इंडीया' ची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारी भारतीय अर्थव्यवस्था जगात वेगवान व जोमाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था ठरली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील ही वृध्दी चीनला सुध्दा मागे टाकणारी आहे. मागील दोन दशकापासून भारताचा विकास दर (GDP Rate) हा जवळपास ७ टक्क्यांच्या आसपास आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत दिर्घकाळ होणारी वृध्दी ही समग्रलक्षी आर्थिक घटकांतील बदल, सुदृढ बचत व गुंतवणुक, इतर देशांशी असणारे मैत्रीपुर्ण आर्थिक संबंध, सेवा क्षेत्राचा विकास व निर्यात, युवाशक्ती, सरकारच्या धोरणात्मक सुधारणा या सर्वाचा एकत्रीत परिणाम आहे. म्हणूनच जागतिक बँकेच्या अहवालात मोठी व वेगवान अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेचा उल्लेख केलेला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये (Objective of Study)**

१) अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रनिहाय वृध्दीचा अभ्यास करणे.

२) स्थूल आर्थिक घटकात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

३) नव्या सरकारच्या धोरणात्मक सुधारणांचा व नव्या संकल्पनांची आर्थिक विकासातील भुमिका तपासणे.

**अभ्यासपध्दती :-**

प्रस्तुत अभ्यासासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला असुन संबंधीत माहिती व आकडेवारी संदर्भग्रंथ, नियतकालिके, अहवाल व संकेतस्थळे याद्वारे संकलित केली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत मागील काही वर्षापासून झपाट्याने वाढ होत असुन भारताचा आर्थिक विकास दर २०१४ मध्ये ६.९ टक्के होता. त्यात २०१५ मध्ये ७.३ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही अंदाजे २०१४ मध्ये १२९.५७ ट्रिलियन डॉलर मागील वर्षाशी तुलना करता ११८.२३ ट्रिलियन डॉलर इतकी होती. सप्टेंबर २०१५ मध्ये प्रसिध्द झालेल्या गोल्डमॅन सॅशे अहवालानुसार बँकींगचा वाढता वापर, तंत्रज्ञानाचा स्वीकार नागरीकरण आणि संरचनात्मक सुधारणा च्या जोरावर भारत २०१६ ते २०२० दरम्यान सरासरी ८ टक्के दराने विकास साध्य करेल अशी शक्यता वर्तवली आहे. जागतिक विकास बँकेच्या अहवालानुसार भारताचा आर्थिक वृध्दीदर (GDP Rate) चालु आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये ७.५ % अंदाजीत केला आहे.

भारतीय अर्थव्यवस्था साधारणपणे कृषी उद्योग व सेवा या तीन क्षेत्रात विभागलेली आहे. या तीन क्षेत्रांच्या एकत्रीत विकासावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून आहे. भारताची क्षेत्रनिहाय वृध्दी पुढील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

**तक्ता क्र. १**

**क्षेत्रनिहाय स्थूल देशांतर्गत उत्पादन व रोजगारांतील वाटा (२०१४)**

टक्केवारीमध्ये

| अ.नं. | क्षेत्र | जीडीपीतील वाटा | रोजगाराचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कृषी व संलग्न क्षेत्र | १७ | ४९ |
| २ | उद्योग क्षेत्र | २६ | २२ |
| ३ | सेवा क्षेत्र | ५७ | २९ |

**स्त्रोत :-** आर्थिक सर्व्हेक्षण अहवाल सन २०१४-१५

ISSN - 2278-9308

**कृषीक्षेत्र :-**

कृषी उत्पादनात भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. प्राथमिक क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कृषी व संलग्न क्षेत्राचा वाटा २०१४ मध्ये १७ टक्के इतका असुन रोजगाराचे प्रमाण ४९ टक्के इतके होते. भारतीय अर्थव्यवस्थेचा ज्या वेगाने विकास होत आहे. त्या तुलनेत कृषीचा विकास हा खालवत चालला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतीच्या उत्पादनात सातत्याने घट होत आहे. म्हणूनच १९५१ पासून कृषीचा स्थुल देशांतर्गत उत्पादनातील वाटा सातत्याने घटत आहे. भारत हा जगात दुध, ज्युट, डाळींचा मोठा उत्पादक देश आहे. तसेच तांदुळ, गहु, ऊस, कापूस, शेंगदाणे, फळे व भाजीपाला यांच्या उत्पादनात भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. एकूण निर्यातीत कृषी निर्यातीचा वाटा सध्या १० % इतका असुन भारताच्या कृषी निर्यातीतही सतत घट होत आहे.

**उद्योग क्षेत्र :-**

आर्थिक विकासात औद्योगिकरणाची भूमिका महत्वाची असुन स्थूल देशांतर्गत उत्पादनातील २६ टक्के वाटा या क्षेत्राचा आहे. तर एकूण रोजगारात २२ टक्के इतके योगदान आहे. भारताचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक (IIP) सप्टेंबर २०१५ तील ३.८ टक्क्यांवरुन ऑक्टो २०१५ मध्ये ९.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे.

**सेवा क्षेत्र :-**

जगामध्ये भारतीय सेवा क्षेत्राचां झपाट्याने होणारा विकास ही उल्लेखनीय बाब असुन या क्षेत्राचा २००१ पासून साधारणपणे ९ टक्के वार्षिक दराने विकास होत आहे. २०१२-१३ मध्ये या क्षेत्राचा जीडीपी तील वाटा ५७ टक्के इतका जास्त होता. एकट्या सेवा क्षेत्रातून २९ टक्के लोकांना रोजगार पुरवला जातो. माहिती तंत्रज्ञान व बीपीपी क्षेत्राचा झपाट्याने विकास होत असुन या क्षेत्राचे निर्यातीतील योगदान महत्वपुर्ण आहे. सेवा क्षेत्राच्या वृध्दीमुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक स्पर्धेत वेगवान वृध्दी करणारी ठरली आहे.

**रिटेल क्षेत्र :-**

भारत सरकारने २०१२ मध्ये रिटेल क्षेत्रासाठी परकीय थेट गुंतवणुकीचे नियम शिथिल करुन परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक मर्यादा सिंगल ब्रँड रिटेलसाठी १०० टक्के व मल्टीब्रँड रिटेलसाठी ५१ टक्के करण्यात आली. भारतातील रिटेल मार्केट हे जगात सर्वात जास्त वेगाने विकसीत होणारे मार्केट आहे. रिटेल क्षेत्राचा भारताच्या जीडीपी तील वाटा हा जवळपास १४ ते २० टक्यांच्या दरम्यान आहे. भारताच्या रिटेलमार्केटचे आकारमान हे ४५० यु.एस. बिलीयन डॉलर इतके मोठे आहे. हा भारताच्या विकासातील महत्वाचा सुचक आहे.

अलिकडच्या काळात भारताच्या आर्थिकवृध्दीबरोबरच रथुल आर्थिक घटकांत महत्त्वपुर्ण बदल होत आहे. आर्थिक वृध्दी साध्य करण्यासाठी या समग्रलक्षी घटकांची अनुकुलता आवश्यक असते. चलनवाढ आटोक्यात, व्यवहारतोल अनुकुलता, परकीय गुंतवणुकीचा वाढता ओघ हे आर्थिक विकासाचे निर्देशक मानले जातात. जागतिकीकरणाचा स्विकार केल्यापासून भारताच्या व्यवहारतोतात अनेक चढउतार निर्माण झाले आहे. निर्यातीत होणाऱ्या वाढीच्या तुलनेत आयातीत होणारी वाढ ही कमी असल्याचे जाणवते. त्यामुळे भारताला नेहमीच चालु खात्यावरील त्रुटीचा सामना करावा लागत आहे. जुलै-सप्टेंबर या तिमाही मध्ये चालु खात्यावरील तुट ही ८.२ बिलीयन यु.एस. डॉलर इतकी आहे. हेच प्रमाण मागील वर्षाच्या याच तिमाहीत १०.९ यु.एस. बिलीयन डॉलर इतके जास्त होते. चालु खात्यावर निर्माण होणाऱ्या तुटीस तेल आयातीच्या बिलात मोठ्या प्रमाणात होणारी वाढ कारणीभुत आहे. कच्या तेलाच्यास आयातीचे परिणाम हे ११८.७ बिलीयन डॉलर जीडीपीच्या ११.११ टक्के इतके जास्त आहे.

परकीय गुंतवणुकदारांच्या भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास वाढल्याने भारताच्या परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचा ओघ सातत्याने वाढत आहे. २०१४ मध्ये परकीय थेट गुंतवणुक ही २१.६ बिलीयन यु.एस. डॉलर वरुन

ISSN - 2278-9308

२०१५ मध्ये ३४.९ बिलीयन डॉलर इतकी वाढली आहे. नोमुरा अहवालानुसार निव्वळ परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचा देशातील ओघ हा स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या १.७ टक्के असुन मागील वर्षाच्या तुलनेत वाढला आहे.

भारत सरकारने परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या बाबतीत उदार धोरण स्विकारले असून काही क्षेत्रात 100 टक्के गुंतवणूकीस मान्यता दिली आहे. 2000 ते 2010 या काळात भारताने 178 बिलीयन डॉलर परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. अर्थव्यवस्था मजबूत होण्याच्या दृष्टिने ही बाब उल्लेखनीय आहे. भारताच्या परकीय राखीव विनीमयाचा विचार करता, असे दिसून येते की, 2015 च्या डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात 352.5 बिलीयन डॉलर इतके परकीय राखीव विनिमय डिसेंबरच्या शेवटच्या आठवडयात 408 बिलीयन डॉलरपर्यंत वाढले आहे. आर्थिक स्थैर्य साधण्यासाठी किंमत स्थैर्य असणे गरजेचे आहे. आर्थिक सर्व्हेक्षण अहवालानुसार चलनवाढीचा दर हा 5 ते 5.5 टक्याच्या दरम्यान राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

आर्थिक व्यवहारात पारदर्शकता यावी यासाठी नव्या सरकारने अनेक धोरणात्मक सुधारणा केल्या आहेत. त्याचाच भाग म्हणून नियंत्रणमुक्त डिझेल किंमती, गॅस अनुदान थेट खात्यात जमा करणे, परकीय थेट गुंतवणूकीच्या आवाक्यात संरक्षण व विमा क्षेत्राचा समावेश, कोळशावरील वटहुकुम ही महत्वाची पाऊले उचलली आहे. आधुनिक भारत या संकल्पनेतून मोदी सरकारने 'मेक इन इंडिया' आणि 'डिजीटल इंडिया' या दोन महत्वपुर्ण घोषणा केल्या आहेत. आर्थिक विकासाचा वेग वाढण्याचे हे एक महत्वपुर्ण कारण मानले जाते. कारण भारताच्या निर्मित क्षेत्रास उत्तेजन देण्याचे कार्य या घोषणेने केले आहे. मोदी सरकारच्या या धोरणामुळे अनेक परकीय कंपन्या आपल्या सेवांचा भारतात विस्तार करू पहात आहे. त्यातून गुंतवणूकीत वाढ होऊन अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. डिजीटल इंडियाच्या माध्यमातून प्रामुख्याने डिजीटल पायाभूत संरचना, डिजीटल वितरण सेवा, डिजीटल साक्षरता वाढवणे या तिन गोष्टीवर प्रकाश टाकला आहे. या व्यतिरीक्तही भारत सरकारने डिजीटल रोजगार विनिमय, स्मार्ट सिटी, अमृत (AMRUT) हे नवीन प्रकल्प सादर केले असून एकंदरीत यातून देशाच्या रोजगार निर्मितीस मोठा वाव व पायाभूत सेवा-सुविधांचा विकास होण्याच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

**सारांश :-**

भारतीय अर्थव्यवस्था ही जगात सर्वात झपाटयाने विकास करणारी अर्थव्यवस्था आहे. सेवा क्षेत्राची वृध्दी, गुंतवणूकदारांचा अर्थव्यवस्थेवरील विश्वास, अनुकुल समग्रलक्षी आर्थिक घटक, सरकारच्या धोरणात्मक सुधारणा, माहिती तंत्रज्ञान व आधुनिकीकरण या सर्वांच्या सहाय्याने भारतीय अर्थ व्यवस्थेने जागतीक स्पर्धेत आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे. म्हणूनच पुढील काळात भारतीय अर्थव्यवस्था तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्याची शक्यता आहे.

**संदर्भसुची :-**

1) Datta,R and Sundaram, K.P.M. : Indian Economy, S.Chand and Co.Ltd. New Delhi.
2) कोळंबे, रंजन (2015) : भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे
3) Annual Report of R.B.I. 2015-16
4) Economics Survey 2015-16
5) WWW.ibef.org
6) WWW.wickipedea.com